जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -५०६ दिनांक - ०३/१२/२०२४**

युनिट-०४ गुन्हे शाखा, पुणे शहर

## वाहनाची ताडफोड करुन दहशत माजवणारे ताब्यात

मा.अपर पोलीस आयुक्त गुन्हे, श्री शैलेश बलकवडे, मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री. निखिल पिंगळे, मा. सहायक पोलीस आयुक्त गुन्हे-२ श्री. राजेंद्र मुळीक, यांचे सुचनांप्रमाणे पोलीस निरीक्षक श्री.अजय वाघमारे, युनिट-४ गुन्हे शाखा पुणे शहर यांनी युनिट-४ चे हद्दीमध्ये गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग करुन रेकॉर्डवरिल आरोपी चेक करणे तसेच खडकी पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर ३३५/२०२४ बी. एन. एस. कलम १२५, ३२४ या दाखल गुन्हयाचा समांतर तपास करुन त्यामधील पाहिजे आरोपी मिळुन आल्यास कारवाई करण्याचे आदेश दिले.

प्राप्त आदेशाप्रमाणे युनिट-४ कडील पोलीस स्टाफ खडकी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०२/१२/२०२४ रोजी गुन्हे प्रतिबंधक गस्त करत असताना पोलीस अंमलदार जहांगीर पठाण, विशाल इथापे यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, दि.०१/१२/२०२४ रोजी इंदीरानगर, खडकी, पुणे येथे गाड्यांवर दगडफेक करुन तोडफोड करणारे इसम हे गाडी अड्डा, दत्तमंदीराजवळ, खडकी बाजार, पुणे येथे असल्याची माहिती मिळाली. सदर ठिकाणी जावुन नमुद इसमांना ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारून नमुद विधीसंघर्षित बालकांना विश्वासात घेवुन बातमीतील दगडफेक करुन वाहनाची तोडफोड केले बाबत तपास केला असता त्यांनी त्यांचा साथीदार नामे त्यांचा मित्र याचेबरोबर दगडफेक करुन वाहनाची तोडफोड केल्याचे सांगितले असता खडकी पो. स्टे. येथे संपर्क करुन माहीती घेतली असता त्याबाबत **खडकी पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर ३३५/२०२४ बी. एन. एस. कलम १२५, ३२४** प्रमाणे गुन्हा दाखल असल्याची माहीती मिळाली. नमुद विधीसंघर्षित बालक यांना पुढील कायदेशीर कारवाई करीता खडकी पोलीस ठाणेचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास खडकी पोलीस ठाणे करीत आहे.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त गुन्हे, श्री शैलेश बलकवडे, मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री. निखिल पिंगळे, मा. सहा.पोलीस आयुक्त गुन्हे-२ श्री.राजेंद्र मुळीक, युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अजय वाघमारे, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप-निरीक्षक वैभव मगदुम, सहा.पो.फौ. यास्मीन सय्यद, पोलीस अंमलदार विठ्ठल वाव्हळ, प्रविण भालचीम, जहांगिर पठाण, मनोज सांगळे, विशाल ईथापे, मपोशि रोहिणी पांढरकर, चालक सहा.पो. फौ. शितल शिंदे यांनी केली आहे.